# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र. : २५६०११८९/९०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

आरक्षण कक्ष
गणेशखिंड, पुणे - ४११००७.
ई-मेलः arakshan_ar@unipune.ac.in

संदर्भ क्र. आरक्षण/ओ-२२/ 1919

दिनांक : २८/०९/२०१३

प्रति,
मा.प्राचार्य/मा.संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

**विषय : सामाजिक आरक्षणानुसार संबंधित मागास प्रवर्गातील पात्र उमेदवार उपलब्ध नसल्यास त्या पदावर तासिका तत्वावर किंवा Against Category म्हणून तात्पुरती नियुक्ती करतांना त्याच प्रवर्गातील उमेदवारास नियुक्ती देण्याबाबत.**

**संदर्भः- शासन परिपत्रक क्र. - संकिर्ण २०१२/(२३७/१२)/विशि-१, दिनांक- १७/०९/२०१३.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भीय शासन परिपत्रकास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सामाजिक आरक्षणानुसार संबंधित मागास प्रवर्गातील पात्र उमेदवार उपलब्ध नसल्यास त्या पदावर तासिका तत्वावर किंवा Against Category म्हणून तात्पुरती नियुक्ती करतांना त्याच प्रवर्गातील उमेदवारास नियुक्ती देण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. सदर शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडलेली आहे.

सबब, संदर्भीय शासन परिपत्रकातील तरतूदीनुसार व याबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी, ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

२८/९/13

उपकुलसचिव
(आरक्षण कक्ष)

सोबतः- शासन परिपत्रक क्र.-संकिर्ण २०१२/(२३७/१२)/विशि-१, दिनांक- १७/०९/२०१३.

G:\pk 2013\Circulars.docx

सामाजिक आरक्षणानुसार संबंधीत मागास प्रवर्गातील पात्र उमेदवार उपलब्ध नसल्यास त्या पदावर तासिका तत्वावर किंवा Against Category म्हणून तात्पुरती नियुक्ती करतांना त्याच प्रवर्गातील उमेदवारास नियुक्ती देण्याबाबत......

आरक्षण कक्ष
पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७
दिनांक - 24/9/13 आवक क्र.- 2113
विभाग -

## महाराष्ट्र शासन

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**शासन परिपत्रक क्रमांकः संकिर्ण २०१२/(२३७/१२)/विशि-१**

**मंत्रालय विस्तार भवन**

**मुंबई-४०० ०३२**

तारीख: **१७ सप्टेंबर, २०१३**

मा. कुलसचिव कार्यालय
पुणे विद्यापीठ, पुणे-७.
आवक क्र.-आर/ 3178
दिनांक - 23/09/13
जावक दिनांक- 24/09/13
आरक्षण कक्ष

**प्रस्तावना :-**

अध्यापक पदासाठी अकृषि विद्यापीठे/ महाविद्यालयाने प्रसिध्द केलेल्या जाहिराती नुसार मागासवर्गीय प्रवर्गातील पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन प्रचलित तरतूदीनुसार एका शैक्षणिक वर्षासाठी नेट/सेट अथवा पीएच.डी. धारक नसलेल्या परंतु पदव्युत्तर पदवीमध्ये ५५% पेक्षा अधिक गुण प्राप्त करणाऱ्या खुल्या प्रवर्गातील उमेदवारास तात्पुरत्या स्वरुपात (Against Category) किंवा तासिकातत्वावर नियुक्ती करण्यास संबंधीत विद्यापीठांकडून मान्यता देण्यात येते. अशास्वरुपाच्या नियुक्त्या पुढे अनेक वर्षे सुरु ठेवण्यात येतात. त्यामुळे यासंदर्भात आवश्यकते आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**परिपत्रक**

२. वर प्रस्तावनेत नमूद केलेली पार्श्वभूमी विचारात घेता यासंदर्भात शासन पुढील प्रमाणे निर्देश देत आहे :-

(i) सामाजिक आरक्षणानुसार ज्या मागास प्रवर्गासाठी पद आरक्षीत करण्यात आले आहे, त्या पदावर संबंधित मागास प्रवर्गातील पात्र उमेदवारा अभावी पद भरणे शक्य नसल्यास, अशा ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात (Against Category) किंवा तासिकातत्वावर त्याच मागास प्रवर्गातील नेट/सेट/पीएच.डी धारक नसलेल्या परंतु इतर शैक्षणिक अर्हता पूर्ण करणाऱ्या उमेदवारास नियुक्ती देण्यात यावी.

(ii) तसेच अशा जागेवर जो पर्यंत संबंधीत मागास प्रवर्गातील पात्र उमेदवार उपलब्ध होत नाही, तो पर्यंत अकृषि विद्यापीठे/ महाविद्यालयाने जाहीराती देऊन पात्र उमेदवार मिळविण्याचे प्रयत्न सुरु ठेवावेत.

(iii) दरम्यान, वरील प्रमाणे नियुक्त केलेल्या अध्यापकास नेट/सेट अथवा पीएच.डी. पदवी/अर्हता प्राप्त करण्यासाठी संबंधीत विद्यापीठांनी आवश्यकत्या सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. जेणे करुन सदर अध्यापक आवश्यक असलेली पात्रता/अर्हता धारण करु शकतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०९१७१७४९३२७५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**विकास तु. कदम**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राज भवन, मलबार हिल, मुंबई
२. सर्व कुलगुरु, अकृषि विद्यापीठे,
३. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
४. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
५. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
६. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.
७. मा.मंत्री (उ व तं.शि.) यांचे खाजगी सचिव,
८. मा.राज्यमंत्री (उ व तं.शि.) यांचे खाजगी सचिव,
९. सर्व अवर सचिव/कार्यासन अधिकारी, उ व तं.शि.,मंत्रालय, मुंबई